# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २३९- २३** **दिनांक : - ३१/०७/२०२३**

## घरफोडी व चोरी करणाऱ्या आरोपीतास अटक.
## वसई पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी

दिनांक १७/०७/२०२३ रोजी वसई पोलीस ठाणे हद्दिमध्ये पुष्कर अपार्टमेंट बाभोळा येथे सायंकाळी ०५:०० वा.चे सुमारास चांदीचे दागिणे चोरी झाल्याबाबत फिर्यादी नामे समिता विश्वास मोरे,रा.बाभोळा,वसई,पश्चिम यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन गु.र.क्रं २२०/२३ भा.द.वि. कलम ४५४, ४५७, ३८० अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

मागील काही दिवसामध्ये वसई पोलीस ठाणे हद्दिमध्ये घरफोडी व चोरीच्या गुन्हयांमध्ये वाढ झाल्याने सदर गुन्हयांना आळा घालून दाखल गुन्हयांची लवकरात लवकर उकल करण्यासाठी वरिष्ठांनी गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांना सुचना व मार्गदर्शन केले होते. त्याअनुषंगाने दोन पथके तयार करुन गुन्हयाचा तपास चालू होता.

तपासादरम्यान मिळालेल्या गुप्त बातमी व तांत्रिक विश्लेषणाद्वारे आरोपी नामे राकेश राजेश मस्तान यास ताब्यात घेवुन तपास केला असता सदर आरोपीत याने वर नमुद गुन्हा संगनमताने केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना सदर गुन्हात दिनांक २३.०७.२०२३ रोजी अटक करण्यात आली आहे. त्याच्याकडे केलेल्या तपासा दरम्यान त्याने वसई व माणिकपुर पोलिस ठाणे कार्यक्षेत्रात ६ गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले असून त्याच्या कडुन चांदीचे दागिणे, मोबाईल, लॅपटॉप, टॅब, कॅमेरा असा एकुण ६९,०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

**:- उघडकीस आलेले गुन्हे खालीलप्रमाणे :-**

| अं.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि.नं. | कलम |
|---|---|---|---|
| १. | वसई | I २२०/२०२३ | भा.दं.वि.सं.४५४,४५७,३८०(मुळ गुन्हा) |
| २. | वसई | I २३०/२०२३ | भा.दं.वि.सं.४५४,४५७,३८० |
| ३. | वसई | I १७३/२०२३ | भा.दं.वि.सं.३७९ |
| ४. | वसई | I २२७/२०२३ | भा.दं.वि.सं.३७९ |
| ५. | माणिकपूर | I २६७/२०२३ | भा.दं.वि.सं.४५४,३८० |
| ६. | माणिकपूर | I २७३/२०२३ | भा.दं.वि.सं.४५४,३८० |

सदरची कामगिरी श्रीमती. पौणिमा चौगुली-श्रींगी, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ - २ वसई, श्रीमती. पद्मजा बढे, सहा.पोलीस आयुक्त, वसई विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. रणजित आंधळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वसई पोलीस ठाणे, श्री. ऋषिकेश पवळ, पोलीस निरिक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि. राम सुरवसे, सुनिल पवार, पो.हवालदार सुनिल मलावकर, मिलींद घरत, पो.अंमलदार सुर्यकांत मुंढे, अक्षय नांदगावकर यांनी केलेली आहे.


मिरा - भाईदर, वसई - विरार पोलीस आयुक्तालय
वसई पोलीस ठाणे
दुरध्वनी - ०२५० - २३२२१८८ (कार्यालय)
Email : pi.vasai.mb-vv@mahapolice.gov.in
महाराष्ट्र पोलीस
महाराष्ट्र पोलीस

-

**----000-----**